# Regional Marathi Text Bulletin, Chatrapati Sambhajinagar

## Date – 15 March 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ मार्च २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- स्वनिधी योजनेमुळे आत्मनिर्भर पथविक्रेत्यांना मोठी स्वप्न पाहण्याचं बळ- पंतप्रधानांचं प्रतिपादन
- पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दोन रुपयांनी कपात
- अश्लील आशय प्रसारित करणाऱ्या १८ ओटीटी मंचांवर केंद्र सरकारची कारवाई
- राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत लातूर जिल्ह्यातल्या कासार बालकुंदा प्राथमिक आरोग्य केंद्राला दोन लाख रुपयांचा कायाकल्प प्रथम पुरस्कार

आणि

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबई संघाला विक्रमी बेचाळीसावं विजेतपद

****

स्वनिधी योजनेमुळे पथविक्रेता वर्ग आत्मनिर्भर झाला असून, या वर्गाला मोठी स्वप्न पाहण्याचं बळ मिळाल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्लीत काल पंतप्रधान स्वनिधी योजनेच्या लाभार्थ्यांना संबोधित करताना ते बोलत होते. पंतप्रधान स्वनिधी योजना फेरीवाल्यांसाठी महत्त्वाचं साधन असून, कोरोना काळात देशाने या विक्रेत्यांची ताकद पाहिल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. फेरीवाले आणि रस्त्यालगतच्या दुकानदारांनी समाजासाठी दिलेल्या योगदानाबद्दल पंतप्रधानांनी त्यांच अभिनंदन केलं. यावेळी त्यानीं एक लाख पथविक्रेत्यांना कर्जाचं वितरण केलं. आतापर्यंत देशभरात ६२ लाखांहून अधिक फेरीवाल्यांना १० हजार ९७८ कोटी रूपयांहून अधिक जास्त रकमेची कर्ज वितरित करण्यात आली आहेत.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी माजी सनदी अधिकारी ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू यांची देशाचे नवे निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक केली आहे. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्रालयानं यासंदर्भात आदेश जारी केला.

दरम्यान, एक देश एक निवडणूक मुद्यावर स्थापन समितीनं काल आपला अहवाल राष्ट्रपतींकडे सादर केला. १८ हजार ६२६ पानांच्या अहवालात या समितीनं, निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या दृष्टीनं कायद्यात ४४ सुधारणा करण्यास सुचवलं आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली होती.

****

निवडणूक आयोगानं निवडणूक रोख्यांची माहिती त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार भारतीय स्टेट बँकेनं परवा आयोगाला ही माहिती दिली होती.

****

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दोन रुपयांनी कपात करण्यात आली आहे. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल ट्विट करुन ही माहिती दिली. त्यानुसार मुंबईत पेट्रोलचे दर प्रतिलिटर १०४ रुपये २० पैसे, तर डिझेलचे दर ९२ रुपये १५ पैसे प्रतिलिटर झाले आहेत. आजपासून हे नवे दर लागू झाले.

****

अश्लील आणि असभ्य आशय प्रसारित करणाऱ्या १८ ओटीटी मंचांवर केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालयानं बंदी घातली आहे. त्याचबरोबर आक्षेपार्ह माहिती देणाऱ्या १९ वेबसाईट, १० ॲप आणि ५७ सोशल मीडिया अकांउंटसवर देखील मंत्रालयानं कारवाई केली आहे. या सर्वांचं प्रसारण कालपासून रोखण्यात आलं.

****

वर्धा जिल्ह्यात सिंदी रेल्वे इथलं ड्रायपोर्ट आणि मल्टी मोडल लॉजिस्टिक पार्क इथल्या रेल्वे टर्मिनल सेवेचं उद्घाटन, काल केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झालं. सिंदी रेल्वे इथल्या ड्रायपोर्ट वरून विदर्भातला कापूस, कापड, संत्री यासारख्या उत्पादनाची निर्यात करता येईल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

****

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेनं काल नाशिक जिल्ह्यातून मार्गक्रमण केलं. चांदवड इथं जाहीर सभेला संबोधित करताना त्यांनी, काँग्रेस सरकारचे आणि आपले दरवाजे सदैव शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी खुले असल्याचं सांगितलं. कांद्याचा मुद्दा शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, केंद्र सरकार या मुद्यावर मौन बाळगून असल्याचा आरोपही त्यांनी केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार, ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी उपस्थित होते.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या राज्यातल्या ४८ जागांचं वाटप येत्या आठवडाभरात जाहीर होईल, अशी माहिती काँग्रेस नेते अमित देशमुख यांनी दिली. ते काल लातूर इथं वार्ताहरांशी बोलत होते.

****

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटानं शरद पवार यांचं नाव आणि छायाचित्र वापरू नये, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणी दरम्यान, न्यायालयानं हे आदेश दिले. या संदर्भात अजित पवार गटाला दोन दिवसांत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश न्यायालयानं दिले असून, या संदर्भात पुढची सुनावणी १९ मार्चला होणार आहे.

****

नवमतदारांसाठी, मेरा पहला वोट देश के लिए, हे मतदार जागरूकता अभियान सरकारने सुरु केलं आहे. प्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे यांनी सर्व नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे....

****

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पश्चिम मतदारसंघातल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची काल आढावा बैठक घेतली. पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणूक प्रक्रिया राबवण्यासाठी काम करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

दरम्यान, परभणी जिल्ह्यात गंगाखेड विधानसभा मतदार संघात सर्व नोडल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं प्रशिक्षण काल झालं. अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे यावेळी उपस्थित होते.

बीड इथं यासंदर्भात झालेल्या प्रशिक्षण कार्यशाळेत जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी मार्गदर्शन केलं.

****

राज्यातल्या मान्यताप्राप्त प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अनुदानित शाळांमधल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दोन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना एक जानेवारी २०२४ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय काल जारी करण्यात आला. ही योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहणार नाही, तसंच थकबाकी देय होणार नाही, असंही स्पष्ट करण्यात आलं आहे.

****

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कायाकल्प पुरस्कार जाहीर झाले आहेत. लातूर जिल्ह्याच्या कासार बालकुंदा इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्राला दोन लाख रुपयांचा कायाकल्प प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. जिल्ह्यातल्या ३२ प्राथमिक आरोग्य केंद्राची कायाकल्प प्रोत्साहनपर पुरस्कारासाठी राज्यस्तरावरुन निवड झाली आहे, या संस्थाना प्रत्येकी रुपये ५० हजार रुपये पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारांतर्गत राज्यात सर्वाधिक ५८ लाख रुपयांहून अधिक रकमेचे पुरस्कार लातूर जिल्ह्याला मिळाले आहेत.

****

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईनं अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली विजय साकारत विक्रमी बेचाळीसावं विजेतपद पटकावलं. अंतिम सामन्यात मुंबई संघानं विदर्भ संघाचा १६९ धावांनी पराभव केला. दुसऱ्या डावात शतकी खेळी करणारा आणि दोन बळी टिपणारा मुशीर खान सामनावीर ठरला. तर, स्पर्धेत पाचशेपेक्षा अधिक धावा आणि २९ बळी अशी कामगिरी करणारा तनुष कोटीयन मालिकावीर ठरला.

****

परभणी जिल्ह्यातल्या मानवत तालुक्यातल्या पाळोदी गावात जल जीवन मिशन योजनेमुळे घराघरात दररोज नळाचं पाणी उपलब्ध झालं आहे. या योजनेतून या गावात दोन कोटी रुपयांच्या निधीतून विहीर, पाणी टाकी आणि जलवाहिन्यांची कामं पूर्ण करून ६५० घरानां नळ जोडणी करून नियमितपणे पुरेशा दाबाने पाणी

पुरवठा होत आहे. याविषयी गावातले रहिवाशी रामराव काकडे आणि अरुणा सोळंके यांनी माहिती दिली.

✻✻✻✻

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जालना शहरातल्या छत्रपती संभाजी उद्यानात उभारण्यात आलेल्या दीडशे फूट उंचीच्या राष्ट्रीय ध्वजाचं काल केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते लोकार्पण झालं. दरम्यान, जालना शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या घाणेवाडी जलाशयासह जायकवाडी पाणीपुरवठा योजनेच्या ७२ कोटी रुपयांच्या सुधारणात्मक कार्यक्रमांचा शुभारंभही काल दानवे यांच्या हस्ते झाला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात फुलंब्री इथं देखील विविध विकासकामांचं लोकार्पण आणि भूमिपूजन त्यानीं केलं.

✻✻✻✻

राज्य शासनाच्या गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार अभियानाला नांदेड जिल्ह्यात सुरुवात करण्यात आली. शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असं आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे. दरम्यान, राज्य शासनाच्या लेक लाडकी योजनेअंतर्गत जिल्ह्यातल्या २०१ लाभार्थ्यांना काल जिल्हाधिकारी राऊत यांच्या हस्ते पहिला हप्ता वितरीत करण्यात आला.

✻✻✻✻

नांदेड इथं येत्या १६ आणि १७ तारखेला ग्रंथोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात होणाऱ्या या ग्रंथोत्सवाचा लाभ घेण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनाने केलं आहे.

✻✻✻✻